| | |
|---|---|
| MHRG040029082025 | दाखल तारीख : २५-०७-२०२५<br>नोंदणी तारीख : १९-०८-२०२५<br>निकाल तारीख : १३-०४-२०२६<br>कालावधी : वर्षे महिने दिवस<br>००  ०८  १९ |

**दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर, पनवेल, जिल्हा रायगड यांचे न्यायालय.**
**(पिठासीन अधिकारी नयोमी पी. पवार)**

**हिंदू विवाह अर्ज क्र. ५७६/२०२५**
**निशाणी क्र.१४/ब**

| | | |
|---|---|---|
| | | **.... अर्जदार क्र. १** |
| | **आणि** | |
| | | **... अर्जदार क्र. २** |

---

अर्जदार क्र. १ व २ तर्फे वकील संकेश राजेश ठाकरे

---

अर्ज हिंदू विवाह कायदा १९५५, कलम १३(ब) प्रमाणे संमतीने घटस्फोटसाठी अर्ज.

## <u>न्यायनिर्णय</u>

(दिनांक १३/०४/२०२६ रोजी घोषित)

१. अर्जदार क्र. १ व २ यांनी प्रस्तुतचा अर्ज हिंदू विवाह कायदा, १९५५ चे कलम १३(ब) प्रमाणे एकमेकांच्या संमतीने घटस्फोट मंजूर होणेकरीता दाखल केलेला आहे.

२. अर्जदार क्र. १ व २ यांचा विवाह दिनांक **१९/०४/२०२२** रोजी श्रीराम मंदिर पोलीस ग्राउंड जवळ, बुलढाणा येथे हिंदू धर्मशास्त्र व जातीरिवाजानुसार संपन्न झाला. सदर विवाह संबंधातून अर्जदार यांना देवांश हा मुलगा झाला आहे.

३. अर्जदार पुढे असे कथन करतात की, लग्नानंतर ते एकत्रित राहिले परंतु अर्जदारांचे स्वभाव भिन्न असल्यामुळे त्यांच्यामध्ये मतभेद निर्माण झाले व वादविवाद होवू लागले त्यामुळे त्यांना एकमेकांबरोबर संसार करणे अत्यंत कठीण झाले. त्यामुळे दि.१८/०४/२०२४ पासून अर्जदार हे एकमेकांपासून विभक्त रहात आहेत. अर्जदारांचा संसार सुखाचा व्हावा म्हणून प्रयत्न करणेत आले परंतु, त्यास यश आले नाही. यापुढे अर्जदार एकत्रित राहू शकणार नाहीत अशी त्यांची खात्री झाली आहे. त्यामुळे दोन्ही अर्जदारांनी एकमेकांपासून संमत्तीने घटस्फोट घेण्याचे ठरवून सदरचा घटस्फोटाचा अर्ज दाखल केला आहे.

४. अर्जदार क्र. १ व २ यांनी अनुक्रमे **निशाणी क्र. ६ व ७** कडे पुराव्याची प्रतिज्ञापत्रे दाखल केलेली आहेत. तसेच अर्जदारांचे आधारकार्डाची पडताळणी केलेली प्रत (**नि.क्र.९ व नि.क्र.१०**), अर्जदारांच्या लग्नाची पत्रिका (**निशाणी क्र. ११**) तसेच अर्जदारांच्या विवाह नोंदणीचे प्रमाणपत्र (**निशाणी क्र. १२**), अर्जदारांचा मुलगा देवांश याच्या जन्माच्या दाखल्याची पडताळणी केलेली प्रत (**निशाणी क्र. १३**) असे कागदपत्र दाखल केलेले आहेत. तसेच अर्जदारांनी त्यांची पुरावा बंद केल्याची पुरशीस **नि.क्र. ८** कडे दाखल केली आहे.

५. अर्जदारांनी सादर केलेल्या पुराव्यावरुन असे दिसते की, अर्जदार हे अर्ज

दाखल करण्यापूर्वी एकमेकांपासून सुमारे एक वर्षांपेक्षा अधिक काळापासून विभक्त रहात आहेत. यावरुन त्यांचेमध्ये समझोता होण्याची शक्यता नाही, असे सिध्द होते. सदरचा अर्ज अर्जदारांनी दिनांक २५/०७/२०२५ रोजी दाखल केला आहे. अर्जदार हे या न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रात रहात आहेत. हिंदू विवाह कायदा कलम १३ब प्रमाणे अर्ज दाखल केल्यापासून अंतिम निर्णयापर्यंत आवश्यक असलेला ६ महिन्यांचा कालावधी पूर्ण झाला असून उभय अर्जदार हे त्यांच्या निर्णयावर ठाम आहेत.

६. दोन्ही पक्षकारांनी कोणताही दबाव नसताना पती–पत्नीचे नाते संपुष्टात आणण्याचा निर्णय घेतला आहे. या न्यायालयाने दोन्ही पक्षकारांमध्ये कोणतीही सक्ती किंवा जबरदस्ती नसल्याची खात्री केलेली आहे. पक्षकारांतील सर्व वाद मिटलेले आहेत.

७. दोन्ही पक्षकार आपआपल्या मतावर ठाम असून, संमतीने घटस्फोटाचा आदेश व्हावा, अशी विनंती करीत आहेत. वरील सर्व बाबींचे अवलोकन केल्यानंतर, असे स्पष्ट होते की, दोघेही संमतीने घटस्फोट मिळणेकरीता उत्सुक आहेत. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १ | अर्जदारांचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |
| २ | अर्जदार क्र. १ व २ यांचा दिनांक **१९/०४/२०२२** रोजी झालेला विवाह, हिंदू विवाह कायदा कलम १३(ब) अन्वये या आदेशापासून विच्छेदित झाला असे घोषित करण्यात येते. |
| ३ | येणेप्रमाणे हुकूमनामा करण्यात यावा. |
| ४ | अर्जदारांना हिंदू विवाह कायदा १९५५ कलम २३(४) अन्वये न्यायनिर्णयाची प्रत विनामुल्य देण्यात यावी. |

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by NAYOMI PRAKASH PAWAR
Date: 2026.04.13 12:03:11 +0530

पनवेल (नयोमी पी. पवार)

दिनांक – १३/०४/२०२६ दिवाणी न्यायाधीश व. स्तर, पनवेल.